26 SEP 2021 लोकमत

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

नंदकुमार वडनेरे : शिवाजी विद्यापीठ व्याख्यानमालेत मांडले विचार

# स्वतंत्र पूर आपत्ती व्यवस्थापन विभाग हवा

लोकमत न्यूज नेटवर्क

**कोल्हापूर :** राज्यात स्वतंत्र पूर आपत्ती व्यवस्थापन विभाग निर्माण करण्याची आवश्यकता आहे, असे प्रतिपादन जलसंपदा विभागाचे माजी प्रधान सचिव नंदकुमार वडनेरे यांनी शनिवारी येथे केले.

शिवाजी विद्यापीठाच्या 'सेंटर फॉर क्लायमेंट चेंज अँड सस्टेनॅबिलीटी स्टडीज' यांच्यातर्फे आयोजित ऑनलाईन व्याख्यानमालेत दुसरे पुष्प गुंफताना 'धरणे, महापूर आणि हवामान बदल' या विषयावर ते बोलत होते. अध्यक्षस्थानी विद्यापीठाचे प्र-कुलगुरू डॉ. पी.एस. पाटील होते.

डॉ. वडनेरे म्हणाले, पूर हा निसर्गाचा अविभाज्य भाग आहे. तो थांबविता येणार नसला तरी त्याची तीव्रता कमी करणे निश्चितपणे शक्य आहे. पुराच्या अनुषंगाने स्वतंत्र खाते निर्माण करून केवळ पूरकाळातच नव्हे तर संपूर्ण वर्षभर त्याचे नियोजन करण्यासाठी उच्चपदस्थांमध्ये समन्वय आवश्यक आहे. जलशास्त्राचा नव्याने अभ्यास करावा लागेल. मदत-पुनर्वसनासाठी भरीव आर्थिक मदत हवी.



**शिवाजी विद्यापीठाच्या ऑनलाईन व्याख्यानमालेत शनिवारी जलसंपदा विभागाचे माजी प्रधान सचिव नंदकुमार वडनेरे यांनी मांडणी केली.**

## धरणाचे आयुष्य १०० वर्षे

धरणाचे आयुष्य हे त्याच्या संरचनात्मक स्थैर्यावर अवलंबून असते. चांगल्या धरणाचे आयुष्य हे साधारण शंभर वर्षे असते, असे अभियांत्रिकी शास्त्र सांगते. धरणांची चांगल्या पद्धतीने देखभाल व सक्षमीकरण करीत राहणे आवश्यक आहे, असे मतही वडनेरे यांनी व्यक्त केले.

वडनेरे म्हणाले, सातत्याने महापूर येणाऱ्या कोल्हापूर,सांगलीसारख्या जिल्ह्यात पूररेषेची अंमलबजावणी, प्रसंगी कायदा करून करावी. ही दोन्ही ठिकाणे नद्यांच्या दोन्ही बाजूला वसलेली असल्याने तेथे महापूर आला; मात्र तेवढे एकच कारण त्यामागे नाही. योग्य सांडपाणी, निचरा व्यवस्थापनाचा अभाव हा तर तेथे आहेच; शिवाय भौगोलिक परिस्थिती आणि भराव, धरणे, बंधारे, पूल, बांधकामे आदी मानवी अतिक्रमणे ही कारणेही आहेत, असेही ते म्हणाले.

प्र-कुलगुरू डॉ. पाटील म्हणाले, सद्यस्थितीत बदलते हवामान आणि मानवी अतिक्रमणे ही कारणे महापुराला कारणीभूत आहेत. केवळ धरणांना त्यासाठी जबाबदार धरणे चुकीचे आहे. केंद्राचे समन्वयक डॉ. सचिन पन्हाळकर यांनी स्वागत, प्रास्ताविक आणि सूत्रसंचालन केले.

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

26 SEP 2021

पुढारी

# स्वतंत्र पूर आपत्ती व्यवस्थापन विभागाची गरज

## नंदकुमार वडनेरे यांचे प्रतिपादन; शिवाजी विद्यापीठात ऑनलाईन व्याख्यान

**कोल्हापूर : पुढारी वृत्तसेवा**

राज्यात स्वतंत्र पूर आपत्ती व्यवस्थापन विभाग निर्माण करण्याची आवश्यकता आहे, असे प्रतिपादन महाराष्ट्राच्या जलसंपदा विभागाचे माजी प्रधान सचिव नंदकुमार वडनेरे यांनी शनिवारी केले.

शिवाजी विद्यापीठाच्या 'सेंटर फॉर क्लायमेट चेंज अँड सस्टेनॅबिलिटी स्टडीज'तर्फे आयोजित ऑनलाईन व्याख्यानमालेत ते 'धरणे, महापूर आणि हवामान बदल' या विषयावर बोलत होते. अध्यक्षस्थानी प्र-कुलगुरू डॉ. पी. एस. पाटील होते.



**शिवाजी विद्यापीठात आयोजित व्याख्यानात बोलताना माजी प्रधान सचिव नंदकुमार वडनेरे.**

डॉ. वडनेरे म्हणाले, पूर हा निसर्गाचा अविभाज्य घटक आहे. तो थांबविता येणार नसला तरी त्याची तीव्रता कमी करणे शक्य आहे. राज्य व केंद्र सरकार हवामान बदल धोरणासंदर्भात गांभीर्याने विचार करीत आहे. पुराच्या अनुषंगाने स्वतंत्र खाते निर्माण करून पुराच्या काळात नव्हे तर वर्षभर त्याचे नियोजन व संनियंत्रण करण्यासाठी सर्व विभागांतील उच्चपदस्थांमध्ये सुसंवाद व समन्वय साधणे शक्य होईल.

ते म्हणाले, धरणांवरील पूर व्यवस्थापन हे जलाशय प्रचालन आराखड्यानुसार व्हायला हवे. नैसर्गिक कारणे, भौगोलिक परिस्थिती व मानवी अतिक्रमणे यामुळे पूर येणार आहे. मात्र, मोठा पाऊस झाला की, धरणांतून पाणी सोडावेच लागते. पूर नियंत्रण हे कुशल धरण अभियंत्याचे कर्तव्य असते. मात्र, या अभियंत्यासमोर द्विधावस्था असते. कारण, पाणी साठवण त्याची जबाबदारी असते. त्यामुळे पाणी साठवण व पूर नियंत्रण याचे सुयोग्य परिचालन करणे हे कौशल्याचे काम आहे. सद्य:स्थितीत पुराला गाळ जबाबदार असल्याची चर्चा केली जाते. सध्या धरणांमध्ये दहा टक्क्यांवर गाळ असून, कमीत कमी गाळ साठेल, याद्दष्टीने प्रयत्न व्हायला हवेत.

प्र-कुलगुरू डॉ. पाटील म्हणाले, सद्य:स्थितीत महापुरास बदलते हवामान व मानवी अतिक्रमणे ही कारणे कारणीभूत आहेत. केवळ धरणांना त्यासाठी जबाबदार धरणे चुकीचे आहे. मानवाने वर्तनात सुधारणा करणे आवश्यक आहे.

केंद्राचे समन्वयक डॉ. सचिन पन्हाळकर यांनी प्रास्ताविक केले. डॉ. वडनेरे यांनी उपस्थितांच्या शंकांचे निरसन केले.

### पूररेषेची काटेकोर अंमलबजावणी व्हावी

सातत्याने महापूर येत असलेल्या सांगली, कोल्हापूरसारख्या ठिकाणी पूररेषेची काटेकोर अंमलबजावणी, प्रसंगी कायदा करून करायला हवी. ही दोन्ही शहरे नद्यांच्या दोन्ही बाजूला वसलेली असल्याने तेथे महापूर आला. मात्र, केवळ तेवढे एकच कारण त्यामागे नाही. योग्य सांडपाणी निचरा व्यवस्थापनाचा अभाव हा तर तेथे आहेच, त्याचबरोबर कमी कालावधीत झालेली अतिवृष्टी कारणीभूत आहे. याशिवाय हवामान बदल हे नैसर्गिक कारण, भौगोलिक परिस्थिती व भराव, धरणे, बंधारे, पूल, बांधकामे आदी मानवी अतिक्रमणेही अशी कारणे आहेत.

पुढारी

# गणितीय दृष्टिकोन, सामाजिक बांधिलकी यांचा सुरेख संगम : डॉ. यू. एच. नाईक

**कोल्हापूर : पुढारी वृत्तसेवा**

गणितीचा दैनंदिन जीवनात सातत्याने उपयोग होत असतो. त्यामुळे गणितीय दृष्टिकोन व सामाजिक बांधिलकी यांचा सुरेख संगम आहे, असे प्रतिपादन दूरशिक्षण केंद्रातील गणित विषयाचे सहयोगी प्रा. डॉ. यू. एच. नाईक यांनी केले.

शिवाजी विद्यापीठातील दूरशिक्षण केंद्राच्या वतीने उच्चशिक्षण व रोजगाराच्या संधी या विषयावरील ऑनलाईन करिअर मार्गदर्शन पंधरवाडा-२०२१ मधील एम.एस्सी. गणित विषयातील करिअरच्या संधी या व्याख्यानात बोलत होते. प्रा. डॉ. नाईक म्हणाले, आयुष्याचे गणित सुरळीत करण्यासाठी गणित हा विषय महत्त्वाचा आहे. गणित या विषयातून सांख्यिकी, भूमापन, वैद्यकीय, शेअर मार्केट, संगणक, एलआयसी, बॅंकिंग, शैक्षणिक व विमा आदी क्षेत्रामध्ये करिअरच्या संधी आहेत. दूरशिक्षण पद्धती आजच्या काळात महत्त्वपूर्ण भूमिका बजावत आहेत. त्यामुळे दूरशिक्षणाकडे संधी म्हणून पाहिले पाहिजे. प्रास्ताविक सहा. प्रा. दयानंद गावडे यांनी केले. सहा. प्रा. परशराम देवळी यांनी आभार मानले.

पुढारी

# विद्यापीठाकडून फिट इंडिया दौड

**कोल्हापूर : पुढारी वृत्तसेवा**

शिवाजी विद्यापीठ राष्ट्रीय सेवा योजना व नेहरू युवा केंद्र यांच्या संयुक्त विद्यमाने 'आझादी का अमृत महोत्सव' या उपक्रमानिमित्त शिवाजी विद्यापीठ ते शिवाजी स्टेडियम या मार्गावर फिट इंडिया दौड पार पडली.

कार्यक्रमाचे उद्घाटन आ. चंद्रकांत जाधव यांनी निशाण दाखवून केले. अध्यक्षस्थानी प्र-कुलगुरू प्रा. डॉ. पी. एस. पाटील होते. यावेळी नेहरू युवा केंद्राच्या पूजा सैनी, जिल्हा क्रीडा अधिकारी बालाजी बरबडे आदी उपस्थित होते. कार्यक्रमाचा समारोप शिवाजी स्टेडियम येथे व्यवस्थापन सदस्य संजय जाधव यांच्या उपस्थितीत झाला. प्रास्ताविक राष्ट्रीय सेवा योजनेचे संचालक प्रा. अभय जायभये यांनी केले. सूत्रसंचालन जिल्हा सहसमन्वयक प्रा. आदिनाथ कांबळे यांनी केले.

जिल्हा समन्वयक प्रा. संजय पाटील यांनी आभार मानले. कार्यक्रमात ७५ स्वयंसेवक सहभागी झाले होते. कार्यक्रम आयोजनासाठी अधीक्षक सुरेखा आडके, सहा. अधीक्षक सुजित मुंडे, अमोल कुलकर्णी यांनी परिश्रम घेतले.

पुढारी

# विद्यापीठातर्फे ३१८ परीक्षांचे निकाल जाहीर

**कोल्हापूर : पुढारी वृत्तसेवा**

शिवाजी विद्यापीठाच्या वतीने विविध परीक्षांचे निकाल जाहीर करण्यात येत आहेत. शनिवारी बी.कॉम., बी.ए., बी. व्होक अभ्यासक्रमांचे निकाल जाहीर झाले. आजअखेर सुमारे ३१८ परीक्षांचे निकाल घोषित करण्यात आले आहेत.

दरम्यान, विद्यापीठाच्या उन्हाळी सत्रातील मार्च- एप्रिलच्या परीक्षांतर्गत शनिवारी बी.ए., बी.कॉम., एम.ए., एम.कॉम अभ्यासक्रमाच्या परीक्षा झाल्या. १७९ विद्यार्थ्यांनी ऑनलाईन पद्धतीने परीक्षा दिली. परीक्षेत विद्यार्थ्यांना कोणतीही अडचण येऊ नये, यासाठी यंत्रणा कार्यरत ठेवल्याचे परीक्षा व मूल्यमापन मंडळाचे प्रभारी संचालक जी.आर.पळसे यांनी दिली.